CMYK

हीच खरी श्रद्धांजली... वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी देऊन लेकाने दिला दहावीच्या इंग्रजीचा पेपर >> पान 2

अबू आझमी यांच्या विरोधात ठाण्यात शिवसेना आक्रमक >> पान 3

बुलढाण्यात व्यापाऱ्याला लुटण्याचा कट बुलढाणा पोलिसांनी उधळला >> पान 4


# दैनिक आपला विदर्भ


**सुविचार**

एकता हि आपली शक्ती आहे, एकतेच्या मार्गावर समाज व्याप्त आणि समृद्ध असतो.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



गोविंदा-ऋषी कपूर यांना कोणी बोलत नाही... डब्बा कार्टेल अभिनेत्री भडकली

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 202 ■ मंगळवार, दि. 04 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मुंडे-कोकाटेंच्या राजीनाम्यावर फडणवीस, पवार, शिंदेंची बंद दाराआड चर्चा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : १९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्या प्रकरणी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना न्यायालयाने वर्षांचा कारावास आणि ५० हजार दंडाची शिक्षा सुनावली आहे. त्यांच्या विरोधात माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी याचिका दाखल केली होती. तर शिक्षेला स्थगिती मिळण्यासाठी माणिकराव कोकाटे यांनी नाशिक सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. एकीकडे माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेच्या स्थागितीवर सुनावणी लांबणीवर पडली आहे. तर दुसरीकडे विरोधक माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आक्रमक झाले आहेत.**

विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरुन सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या दालनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माणिकराव कोकाटे यांची बंद दाराआड चर्चा झाली. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांच्या राजीनामा घेणार का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दिवंगत पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला. त्यावेळी विधान परिषदेत माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यावरून प्रचंड गदारोळ सुरु झाला. विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे चांगलेच आक्रमक झाले होते. माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी >> पान २

## राहुल नार्वेकरांच्या दालनात बैठक





## 'लाडकी बहीण' योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता मार्चमध्ये

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही नेहमीच चर्चेत असते. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. मात्र या महिलांना फेब्रुवारी महिन्याचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. याच कारणामुळे यावेळी महिलांना मार्च आणि एप्रिल अशा दोन महिन्यांचे पैसे एकत्र दिले जाणार का? असा सवाल केला जातोय. याच मुद्द्यावरून लाखो महिलांत संभ्रम निर्माण झाला आहे. यावरच आता महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी स्वत: समोर येऊन सगळा संभ्रम दूर केला आहे.

आदिती तटकरे यांनी मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला आहे. यावेळी बोलताना त्यांनी लाडकी बहीण योजनेविषयी माहिती दिली आहे. विरोधकांना सुरुवातीपासूनच ही योजना खुपते आहे. या योजनेमुळेच विरोधकांना नैराश्य आलं आहे. याआधी दोनी कोटी २५ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याच्याही लाभार्थी तेवढ्याच असतील. ही योजना जाहीर झाल्यापासूनच विरोधकांना ही योजना खुपते आहे. गेल्या चार ते पाच महिन्यांत महिलांचा या योजनाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळेही विरोधकांमध्ये या योजनेबाबत नैराश्य आलेलं आहे. हेच नैराश्य ते लाडक्या बहिणींमध्ये पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत.

मात्र महायुतीचं सरकार हे सक्षम आहे. ही योजना आम्ही यशस्वीरित्या चालू ठेवणार आहोत. फेब्रुवारी महिन्याचा हफ्ता हा महिला दिनाच्या पूर्वसंध्येला लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होणार आहे. तर मार्च महिन्याचा हफ्ता हा अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर महिलांच्या बँक खात्यात टाकला जाईल, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

म्हणजेच आदिती तटकरे यांनी सांगितल्यानुसार महिलांना फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचे पैसे एकत्र मिळणार नाहीत. फेब्रुवारी महिन्याचे पैसे हे ७ मार्च रोजी मिळतील. तर मार्च महिन्याचे पैसे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर मिळतील, हे स्पष्ट झाले आहे.

# विधानपरिषदेच्या ५ रिक्त जागेवर निवडणूक कार्यक्रम जाहीर

## मतदानाची तारीख ठरली

**दैनिक आपला विदर्भ**

***मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील विधानसभा निवडणुकानंतर आता विधानपरिषदेच्या ५ जागांसाठीची निवडणूक जाहीर झाली आहे. त्यामुळे, आता विधानपरिषदेच्या या ५ जागांवर कोणाचा नंबर लागणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. विधान परिषदेच्या रिक्त जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून २७ मार्च रोजी मतदान प्रकिया पार पडणार आहे. त्यासाठीचा निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आला आहे. भाजपच्या ३, राष्ट्रवादी अजित पवार १ आणि शिवसेना शिंदे गटाच्या १ आमदारांसाठी ही निवडणूक पार पडणार असून या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार केवळ आमदारांना असणार आहे. सध्या, राज्यात भाजप महायुतीला मोठं बहुमत असल्याने या जागांवर पुन्हा संबंधित पक्षाचेच उमेदवार विजयी होतील. मात्र, राजकीय पक्षांकडून कोणाला संधी मिळणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे.***

विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यामुळे विधानपरिषदेवर असलेल्या ५ आमदारांच्या जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामध्ये, शिवसेना शिंदे गटाचे आमदार आमशा पाडवी, राष्ट्रवादी काँग्रेस राजेश विटेकर, भाजप आमदार प्रवीण दटके, भाजप गोपीचंद पडळकर आणि भाजपा रमेश कराड या सदस्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. आता, या रिक्त जागांसाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीकडून कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



आमदार आमश्या पाडवी यांचा विधानपरिषदेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत आहे. तर, राष्ट्रवादीच्या राजेश विटेकर यांचा कार्यकाळ २७ जुलै २०३० पर्यंत आह. भाजप नेते आणि आमदार प्रवीण दटके यांचा कार्यकाळ १३ मे २०२६ पर्यंत असून आमदार रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर यांचाही कार्यकाळ १३ मे २०२६ पर्यंत आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीत हे सर्व आमदार विजयी झाल्याने त्यांच्या रिक्त जागेवर याच महिन्यात निवडणूक होणार आहे.

कसा असेल निवडणूक कार्यक्रम ?

१० मार्च ते १७ मार्च अर्ज भरण्याची प्रक्रिया अर्जाची छाननी १८ मार्च >> पान २

# तिरुपतीप्रमाणेच पंढरीच्या विठुरायाचे टोकन दर्शन

## आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांचे हस्ते पहिले पूजन

**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक येत असतात. आषाढी एकादशीला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आपल्या लाडक्या विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी वारकरी, पायी वारी करतात. मजल, दरमजल करत पंढरपूरला येतात. तासन तास रांगेत उभे राहून बा विठ्ठलाचे तेजोमय रुप आपल्या डोळ्यांत साठवतात. आता, विठुरायाच्या दर्शनाला येणाऱ्या सर्वच भाविकांना लवकरच झटपट दर्शन मिळणार आहे. त्यासाठी तिरुपतीच्या धरतीवर केलेली टोकन दर्शन व्यवस्थेची सुरुवात आषाढी एकादशीला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते केली जाणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. मंदिर समितीची यासंदर्भातली बैठक झाल्यानंतर औसेकर यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानुसार टीसीएस कंपनीकडून या व्यवस्थेचे सॉफ्टवेअर बनविण्यात आले आहे. >> पान २



## विधानसभेवर शिवसेनेचा, तर विधान परिषदेवर काँग्रेसचा विरोधी पक्षनेता

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा विरोधी पक्ष नेते पदासंदर्भात ठाकरे सेना येत्या दोन दिवसात निर्णय घेऊन विधानसभा अध्यक्षांना पत्र देणार असल्याची माहिती समोर आली आहे. या अनुषंगाने आजच्या (३ मार्च) महाविकास आघाडीच्या बैठकीत तिन्ही पक्षांची विस्तृत चर्चा झाली. या चर्चेत विधानसभा विरोधी पक्ष नेते पदावर ठाकरेंची शिवसेना दावा करत असल्याने आजच्या महाविकास आघाडीच्या बैठकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सुद्धा तोंडी सहमती (पाठिंबा) दर्शवली असल्याची माहिती ही पुढे आली आहे. तर ठाकरेंची शिवसेना विधानसभा विरोधी >> पान २

# मंत्री धनंजय मुंडे यांची सत्र न्यायालयात धाव

## कोर्टाच्या अंतरिम आदेशाला आव्हान देणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला आज दोन महिन्यांहून अधिकचा काळ उलटून गेले आहे. अशातच या प्रकरणामुळे राज्याचे अन्नपुरवठा मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीचा जोर वाढला आहे. अशातच मंत्री धनंजय मुंडेंच्या बाबातीत एक महत्वपूर्ण बातमी समोर आली आहे. मंत्री धनंजय मुंडे हे आता सत्र न्यायालयात धाव घेणार असल्याची माहिती पुढे आली आहे. करूणा मुंडे प्रकरणी वांद्रे दंडाधिकारी कोर्टानं दिलेल्या अंतरिम आदेशाला धनंजय मुंडेकडून आव्हान देण्यात येणार असल्याचे सांगितलं जातंय.



दरम्यान, दंडाधिकारी कोर्टानं करूणा मुंडे यांचे धनंजय मुंडेंविरोधातील आरोप अंशत: मान्य करत त्या पोटगीसाठी पात्र असल्याचं म्हटलं होतं. यात करूणा मुंडे यांना दरमहा दोन लाख रूपये भत्ता देण्याचे आदेश ही कोर्टाने दिले होते. या प्रकरणी मंत्री >> पान २

# लातूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावर एसटी बस उलटून ३७ प्रवाशी जखमी

**दैनिक आपला विदर्भ**

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर-नांदेड या राष्ट्रीय महामार्गावरील नांदगावपाटी (ता. चाकूर) येथे मोटारसायकलस्वाराला वाचविण्यात भरधाव वेगातील एसटी पलटी झाल्यामुळे बस मधील जवळपास ३७ जण जखमी झाल्याची घटना सोमवारी दुपारी १.४० वाजता घडली आहे. जखमी पैकी ६ प्रवाशी यांना गंभीर दुखापत झाली असून जखमींवर लातूर येथील विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात उपचार केले जात आहेत.

अतनुर ते लातूर ही बस चाकूर येथून प्रवाशी घेऊन लातूरच्या दिशेने



निघाली असता नांदगावपाटी जवळ एक मोटारसायकलस्वार अचनाकपणे उजव्या बाजूला वळत असल्याचे लक्षात येताच पाठीमागून येणा-या एम. एच. २० बी. एल. १६१३ क्रमांकाच्या बस चालकाने मोटारसायकलस्वाराला वाचविण्यासाठी एसटी बाजूला घेण्याच्या प्रयत्नात नियंत्रण सुटल्यामुळे बस दुभाजकाला घडकून विरूध्द बाजूला पलटी झाली.

## अपघातातील जखमींना तात्काळ उपचार व मदत पुरवा : आ. अमित देशमुख

सोमवारी दुपारी अहमदपूर - लातूर या एसटी बसला आष्टामोड जवळील नांदगाव पाटी नजीक भीषण अपघात झाला. या अपघाताची माहिती मिळताच आपद्ग्रस्तांना सर्वतोपरी तात्काळ मदत करण्यासंबंधी व त्यांच्यावर तातडीने उपचार करण्याच्या सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूरचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता व इतर संबंधितांना दिल्या.



CMYK


## फिरकीचा जादूगार शेन वॉर्न

बरोबर तीन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी ( ४ मार्च २०२२ ) क्रिकेट विश्र्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्र्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्र्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्र्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज दोन वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्र्वावर राज्य केले. १३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या ऍशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्र्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक ग्याटिंग ऑफ साईडला चेंडू टाकला. ग्याटिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गाटिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्र्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्र्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे. शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्र्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता. शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्र्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता. निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतेपद मिळवून दिले. शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# हीच खरी श्रद्धांजली... वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी देऊन लेकाने दिला दहावीच्या इंग्रजीचा पेपर

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** राज्यातील एसएसी बोर्डाची परीक्षा सुरू झाली असून आणखी पुढील १५ दिवस ही परीक्षा चालणार आहे. या परीक्षेदरम्यान अनेक ठिकाणी कॉपी पुरविण्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. अर्थाच, राज्य शासनाने कॉपीमुक्त परीक्षा अभियान जोरकसपणे राबवले असले तरी काही ठिकाणी कॉपी करण्याचा अनुचित प्रकार घडल्याने या अभियानाला गालबोट लागलं. एकीकडे विद्यार्थ्यांना कॉपी पुरविण्यासाठी नातलग, कुटुंबीय आणि शिक्षक मदत करताना दिसून येतात. मात्र, दुसरीकडे डोंगराएवढं दु:ख कोसळूनही काही विद्यार्थी या परीक्षेला समोरे जातात. इंग्रजी विषयाच्या पेपरला अवघे काही तास शिल्लक असताना वडिलाचे छत्र



हरवले. मात्र, यवतमाळमध्ये दु:खात बुडालेल्या एका विद्यार्थ्याने केवळ मुख्याध्यापकांच्या पाठबळाने परीक्षा केंद्रावर साश्रुनयनांनी दहावीची परीक्षा दिली. या विद्यार्थ्याच्या धैर्याचं आणि त्याला पाठबळ देणाऱ्या मुख्याध्यापकांचेही कौतुक होत आहे.

यवतमाळ जिल्ह्याच्या उमरखेड तालुक्यातील सेवालालनगर, टाकळी येथील सुरज संजय जाधव हा विद्यार्थी इंदिरा गांधी विद्यालय गोकुंदा येथे इयत्ता दहावीत शिकत आहे. तो येथील सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या माध्यमिक विद्यालयातील परीक्षा केंद्रावर शुक्रवारी परीक्षा देण्यासाठी पोहोचला होता. राज्यात २१ फेब्रुवारीपासून दहावीची परीक्षा सुरू झाली असून पुढील १५ दिवस ही परीक्षा असणार आहे. शनिवारी १ मार्च रोजी पहाटे सूरजचे वडील संजय जाधव यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. वडिलांचा मृतदेह घरात, अंत्यविधी असा दु:खाचा डोंगर पार करुन इंग्रजी विषयाची परीक्षा द्यायची कशी? असा तो विचार करू लागला. मनाची घालमेल, वडिलांच्या निधनाच्या वेदना, यामुळे जवळजवळ सूरज नशिबाने ओढावलेल्या जीवनाच्या परीक्षेत नापास झाल्याचे चित्र होते. परंतु, अशावेळी त्याने शाळेचे मुख्याध्यापक अरविंद राठोड यांच्याशी भ्रमणध्वनीवर संवाद साधून मी परीक्षा देऊ शकत नाही, असे सांगितले. त्यानंतर, मुख्याध्यापक राठोड यांनी सूरजच्या घरी जाऊन त्याचे सांत्वन करत परीक्षा देऊन तू तुझ्या बाबांना खरी श्रद्धांजली दे, असा मोलाचा सल्ला दिला.

मुख्याध्यापक राठोड यांनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण देऊन त्यांच्या जीवनातील दु:खांवर त्यांनी केलेली मात त्याला पटवून सांगितली. त्यानंतर सुरज परीक्षा द्यायला तयार झाला, वडिलाचा अंत्यविधी करुन परीक्षेसाठी तो सुमतीबाई हेमसिंग नाईक कन्या शाळा, किनवट या परीक्षा केंद्रावर आला. साश्रुनयनांनी त्याने इंग्रजी विषयाची परीक्षा दिली. सुरजच्या या धैर्य आणि धाडसाचे शिक्षकांसह त्याच्या मित्रांनी कौतुक केले. तसेच, वडिलांच्या निधनाबद्दल त्याची भेट घेऊन सांत्वन करण्यात आले. दरम्यान,सूरजने आपल्यावरील कोसळलेल्या संकटातूनही परीक्षेवर मात करत आयुष्याच्या परीक्षेत स्वत:ला सिद्ध केलंय. त्यामुळे, सूरज हा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो.

# गोविंदा-ऋषी कपूर यांना कोणी बोलत नाही... डब्बा कार्टेल अभिनेत्री भडकली

**मुंबई/प्रतिनिधी :** ओटीटीवर अनेक मूव्ही सिरिजचा धमाका होत असतो. प्रत्येक आठवड्यात काही ना काही हटके रिलीज होत असतं. नुकतीच नेटफ्लिक्सवर एक सिरिज रिलीज झाली. ज्याचं नाव आहे 'डब्बा कार्टेल'. या सिरिजने सध्या खळबळ उडवली असून याचीच सर्वत्र चर्चा पाहायला मिळत आहे. या सिनेमातील कास्टही त्यांच्या दमदार अभिनयामुळे चर्चेत आहे. 'डब्बा कार्टेल'मध्ये काम केलेल्या अभिनेत्रीने नुकतंच गोविंदा, ऋषी कपूर यांच्याविषयी केलेलं स्टेटमेंट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

करण जोहरच्या 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' या चित्रपटात रणवीर सिंगच्या बहिणीची भूमिका साकारणारी अभिनेत्री अंजली आनंद 'डब्बा कार्टेल'मध्ये दिसली आहे. २८ फेब्रुवारी रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या या सिरीजच्या प्रमोशन दरम्यान, अंजली आनंदने एक प्लस साईज अभिनेत्री म्हणून पाहिले जाण्याबद्दल सांगितले. ती म्हणाली की चित्रपटसृष्टीत महिलांना नेहमीच अशा प्रकारे न्याय दिला जातो. कोणीही पुरुष कलाकारांना प्लस साईज म्हणत नाही. ती म्हणते की गोविंदा आणि ऋषी कपूर सारख्या कलाकारांना त्यांच्या वजनावरून कधी विचारलं नाही. हे फक्त महिलांसोबतच घडतं.

तिचा असा विश्वास आहे की प्रेक्षक अजूनही 'प्लस साईज' महिलेला मुख्य भूमिकेत पाहण्यास तयार नाहीत. 'डब्बा कार्टेल'च्या प्रमोशन दरम्यान दिलेल्या मुलाखतीत, अभिनेत्री म्हणाली की कोणीही तिला चित्रपटांमध्ये मुख्य अभिनेत्री म्हणून पाहण्यास तयार नाही. ती म्हणते, 'मी वेब सिरीज आणि इतर प्लॅटफॉर्मवर काम करत आहे, पण अजून मोठ्या पडद्यावर संधी मिळालेली नाही.'

तिला मुख्य अभिनेत्री होण्याची इच्छा आहे. ती पुढे म्हणते, हृतिक रोशन आणि गोविंदा एकमेकांपेक्षा पूर्णपणे वेगळे दिसतात, पण गोविंदाला कोणीही सांगितले नाही की तो एक प्लस साईज अभिनेता आहे. ऋषी कपूर यांना कोणीही सांगितले नव्हते की ते एक मोठ्या वजनाचे अभिनेता आहेत, पण माझे नाव नेहमीच अंजली आनंद मोठ्या वजनाच्या अभिनेत्रीशी जोडले जाते. लोकांनी याबद्दल बोलणे थांबवावे अशी माझी इच्छा आहे. आपल्याला हे एक सामान्य गोष्ट बनवायची आहे. बरेच लोक मला इंटरनेटवर मोठ्या आकाराच्या महिलांसाठी बोलण्यास सांगतात.

पान १ वरुन...

## मुंडे-कोकाटेंच्या राजीनाम्यावर

करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तर दिलं. देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या शोक प्रस्तावाच्या दिवशी असा गोंधळ होईल, असं वाटलं नव्हतं. विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण मंत्रिमहोदयासंदर्भात जे मांडत आहात. त्या संदर्भात कोर्टाने सुनावणी पूर्ण केलेली आहे. क्लोज फॉर ऑर्डर ठेवलेली आहे. कोर्टाची ऑर्डर आल्यावर सभागृह किंवा राज्यपाल निर्णय घेतील, असे त्यांनी म्हटले.

यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व कृषी मंत्री माणिकराव कोकाटेंमध्ये विधीमंडळातील विधानसभा अध्यक्षांच्या दालनात बैठक झाली. चारही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा करण्यात आली. १० ते १५ मिनिटं चौघांमध्ये बंद दाराआड चर्चा करण्यात आली. या बैठकीतील चर्चा अद्याप समोर आलेली नाही. मात्र, माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## विधानपरिषदेच्या ५ रिक्त जागेवर

रोजी होणार

२० तारखेला अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस

२७ तारखेला विधान परिषदेच्या जागांसाठी मतदान घेण्यात येणार आहे.

विधान परिषदेतील पक्षनिहाय संख्याबळ :-

एकूण ७८

महायुती - ३२

भाजप १९

शिवसेना ६

राष्ट्रवादी ७

महाविकास आघाडी - १७

शरद पवार ३

काँग्रेस ७

उबाठा ७

अपक्ष ३

एकूण सदस्य संख्या - ७८

विद्यमान सदस्य संख्या - ५२

रिक्त सदस्य संख्या - २६ (स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे जागा अधिक रिक्त आहेत)

## तिरुपतीप्रमाणेच पंढरीच्या

आज या सॉफ्टवेअरबाबत मंदिर समिती सदस्य अधिकारी आणि टीसीएसच्या अधिकाऱ्यांमध्ये महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत आषाढी एकादशी पूर्वी संपूर्ण टोकन दर्शन व्यवस्था पूर्ण होणार असून आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्याच्या हस्ते याचा शुभारंभ केला जाईल, असे ठरले.

देशातील जवळपास नऊ मोठ्या देवस्थानात टीसीएस कंपनीकडून या दर्शन व्यवस्थेचे सॉफ्टवेअर देण्यात आले असून या ठिकाणी गेल्या काही वर्षापासून अतिशय सुरळीतपणे टोकन दर्शन व्यवस्था राबविण्यात येत आहे. हे टोकन दर्शन व्यवस्था सॉफ्टवेअर बनविताना पंढरपुरातील मोठ्या यात्रा सणांचे दिवस आणि इतर महत्त्वाच्या गर्दीच्या दिवसांचा विचार या सॉफ्टवेअरमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठीचे टोकन घ्यावे लागणार असून यावेळेस त्यांना दर्शनाची तारीख आणि वेळ हे टोकन वरुन दिले जाणार आहे. याचवेळेत येऊन या भाविकांना देवाचे दर्शन केवळ दीड ते दोन तासात घेता येणार आहे.

सध्या तरी टोकन दर्शन व्यवस्था सुरू केली तरी काही दिवस भाविकांना माहिती होण्यासाठी मुख्य दर्शन रांग देखील सुरू ठेवली जाणार आहे. याशिवाय देशभरातील भाविकांना ऑनलाइन बुकिंग करूनही देण्यात येणाऱ्या दर्शनाची रांग सुरूच राहणार आहे. आता टोकन दर्शन रांग ऑनलाईन दर्शन रांग आणि मुख्य दर्शन रांग या तिन्हीचे एकत्रीकरण कशा रीतीने करायचे याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि पोलिस अधीक्षक यांच्यासोबत टीसीएस च्या अधिकाऱ्यांची एक बैठक येत्या १५ दिवसांत होऊन त्यानुसार अंतिम आराखडा तयार होईल, अशी माहिती औसेकर यांनी दिली.

## विधानसभेवर शिवसेनेचा

पक्ष नेते पदावर दावा करत असेल तर विधान परिषदेवर काँग्रेस पक्ष दावा करेल, अशी भूमिका काँग्रेस पक्षाने मांडल्याचे माहिती सूत्रांनी दिली आहे.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते पदाचा कार्यकाळ ऑगस्टमध्ये पूर्ण होत आहे. त्यामुळे त्यानंतर विधान परिषद विरोधी पक्षनेते पदावर दावा केला जावा, असं ठाकरेंच्या शिवसेनेकडून मत मांडण्यात आलंय. यावर काँग्रेस पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील असं सांगण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. विधान परिषद विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसकडून सतेज पाटील यांचे नाव चर्चेत आहे. मात्र विधानसभा विरोधी पक्षनेते पदाचं नाव ठाकरेंच्या शिवसेनेने जाहीर केल्यानंतर काँग्रेस आपलं विधान परिषद विरोधी पक्षनेते पदाचे नाव जाहीर करेल असेही सांगण्यात आलंय. सध्या विधानसभा विरोधी पक्षनेते पदासाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडे २० आमदार, काँग्रेस पक्षाकडे १६ आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाकडे १० आमदार आहेत.

त्यामुळे विधानसभा सभागृहात ठाकरेंच्या शिवसेनेचे संख्याबळ अधिक आहे. तर विधान परिषदेचा संख्याबळ पाहता ठाकरेंची शिवसेना सात आमदार आणि काँग्रेस पक्षाचे सुद्धा सात आमदार आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेचा एका आमदाराचा कार्यकाळ ऑगस्टपर्यंत आहे. त्यामुळे संख्याबळाचा विचार करता काँग्रेस विधान परिषद विरोधी पक्ष नेते पदावर दावा करणार असल्याचे बोललं जात आहे.

दरम्यान, दुसरीकडे पुरेसं संख्याबळ नसलेल्या महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्षांपैकी एकाही पक्षाला विरोधी पक्षनेते पद मिळवण्या एवढ्या जागाही जिंकता आलेल्या नाहीत. जर विधानसभा अध्यक्षांनी ठरवलं तरच विरोधकांना हे पद मिळू शकतं अशा चर्चा सुरू आहेत. या अधिवेशनात तरी विधानसभा विरोधी पक्षनेते पद मिळणार का? असा सवाल उपस्थित होत असताना विरोधी पक्षनेते पदाच्या निवडीसाठी कोणतेही खास तरतूद नसल्याचं विधिमंडळ सचिवांनी ठाकरे गटाच्या भास्कर जाधव यांना उत्तर दिलंय. विरोधी पक्ष नेता निवडीचे अधिकार विधानसभा अध्यक्षांना असल्याचेही त्यांनी सांगितलंय.

अशातच या वर भाष्य करताना संजय राऊत म्हणाले की, विरोधीपक्ष नेतेपदी नक्कीच आमचा हक्क आहे. सत्ता कोणाची ही असो, विरोधीपक्षाने आपली कामगिरी चोख बजावली पाहिजे. तुम्ही जरी संशयास्पद निवडून आला असलात तरी भ्रष्टाचारांना वेसन घालण्यासाठी लोकशाहीने तो हक्क दिलाय. विरोधीपक्ष नेत्याचा निर्णय विधीमंडळ पक्ष घेतो. असेही संजय राऊत म्हणाले.

## मंत्री धनंजय मुंडे यांची

धनंजय मुंडे हे आता सत्र न्यायालयात धाव घेणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि कृषी खात्यातील घोटाळ्यांचा आरोप अशा विविध आरोपांमुळे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. परिणामी सर्वस्थरातून आता त्यांच्या राजीनाम्याची मागणी होते आहे. अशातच धनंजय मुंडे आज राजीनामा देतील, दोन दिवसांआधी धनजय मुंडे यांचा राजीनामा लिहून घेतला आहे, असा दावा करणारी फेसबुक पोस्ट करुणा शर्मा मुंडे यांनी काल शेअर केली होती. अशातच आज(३ मार्च) अर्थसंकल्पीय अधिवेशनातील विधानपरिषदेचे कामकाज आटोपल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, फडणवीसांची भेट घेतल्यामुळे धनंजय मुंडे यांनी त्यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला असावा का, अशी चर्चा आता सुरु झाली आहे. अशातच आता मंत्री धनंजय मुंडे हे आता सत्र न्यायालयात धाव घेणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

धनंजय मुंडे यांचा राजीनामा हे प्राधान्य आहे. त्यांचा राजीनाम लिहून घेतला आहे. मात्र आता तो दोन दिवस पुढे ढकलला आहे. दोन दिवसात आम्ही जाहीर करू अशी माहिती आहे. मला हे आचार्य वाटतंय की राजीनामा लिहून घेतला आहे. अजित पवार यांच्या पक्षात धनजय मुंडे यांचे मोठे पद आणि कर्तव्य आहे. म्हणून ते प्रेशर करत असेल की राजीनामा घेतला तर मी पार्टी सोडेल. १०० % मला विश्र्वास आहे आज संपूर्ण महाराष्ट्र एकाच मागणी करत आहे की, धनजय मुंडे यांचा राजीनामा द्यावा. मी मंत्र्यांची बायको आहे, पण मी राजीनामा मागत आहे. याचे कारण आहे की आज जर राजीनामा नाही घेतला तर अजून पुढे असे लोक तयार होणार आणि वाल्मिक सारखे लोक तयार होणार. माझे पती भाजपसोबत होते तेव्हा चांगले होते. मात्र अजित पवार राष्ट्रवादीत गेले आणि वाटोळ झाले. धनजय मुंडे राष्ट्रवाडीत गेले आणि वाटोळ झाले. त्या पक्षात नवाब मलिक, हसन मुश्रीफ असे सगळे करप्ट लोक आहेत.अशी घणाघाती टीका करुणा शर्मा मुंडे यांनी केली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### मुंबई महापालिका गट-अ परीक्षेतील घोटाळ्यावर मनसे आक्रमक, संदीप देशपांडे व आशिष धुरींनी घेतली राज ठाकरेंची भेट



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेच्या गट-अ परीक्षेतील घोटाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) नेते संदीप देशपांडे आणि आशिष धुरी यांनी पक्षप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली. या परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत, त्यांनी याप्रकरणी तातडीने चौकशीची मागणी केली आहे. यावेळी मनसे नेते संदीप देशपांडे यांनी पेपर २५ तारखेला होणार होता, तो आधीच १९ तारखेला फुटला. आमच्या माहितीप्रमाणे, या प्रश्र्नपत्रिकेतील एकेक प्रश्र्न दहा दहा लाख रुपयांना विकला गेला. शेकडो कोटींचा घोटाळा या परीक्षेच्या माध्यमातून झाला आहे, असा गंभीर आरोप संदीप देशपांडे यांनी केला.

### श्री विठ्ठल रुक्मिणी जतन संवर्धनपनाचे काम आषाढी यात्रेपूर्वी पूर्ण होणार



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** श्री विठ्ठल रुक्मिणी जतन संवर्धनपनाचे काम आषाढी यात्रेपूर्वी पूर्ण होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. तसेच टोकन दर्शन सुरू करण्यासाठीची संगणक प्रणाली तयार झाली आहे. लवकरच सुरक्षेच्या दृष्टीने टोकन दर्शनाचा आढावा घेतला जाणार आहे. त्यानंतर आषाढी यात्रेत टोकन दर्शन सुरू होणार आहे. टोकन दर्शन सुरू झाली तरी सामान्य भाविकांचे दर्शन रांग आणि ऑनलाइन दर्शन रांग देखील सुरू ठेवण्याचा निर्णय आज झालेल्या मंदिर समितीच्या बैठकीत घेण्यात आला. दर्शन मंडप आणि स्काय वॉकच्या कामासाठी १३० कोटी रुपये राज्य सरकारने मंजूर केले होते. या कामाचे फक्त टेंडर रद्द झाले आहे. सरकारने दिलेला निधी रद्द झाला नाही त्यामुळे राज्य सरकार विठ्ठल भक्तांना टोकन दर्शन देण्यासाठी बांधील असल्याचा दावा समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केलाय.

### प्रवासादरम्यान महिला रेल्वे प्रवाशांच्या मौल्यवान वस्तूंची चोरी, पोलिसांनी तिघांना ठोकल्या बेड्या



दैनिक आपला विदर्भ


**कल्याण/प्रतिनिधी :** रेल्वे प्रवासादरम्यान महिला प्रवाशांचे मौल्यवान वस्तू चोरणाऱ्या सराईत चोरट्याला कल्याण रेल्वे क्राईम ब्रँच पोलिसांनी अटक केली आहे. महेश धाग असे या चोरट्याचे नाव आहे. विशेष म्हणजे चोरलेले दागिने महेश ज्वेलर्स दुकानात काम करणाऱ्या दोन कामगारांना विकण्यासाठी द्यायचा. हे कामगार चोरलेले दागिने विकून महेशला पैसे द्यायचे. रेल्वे पोलिसांनी महेशला साथ देणारे या दोन ज्वेलरी शॉपच्या कामगारांना देखील अटक केली आहे. नितीन येळे आणि तानाजी माने असं या दोन कामगारांची नावे आहे. रेल्वे पोलिसांनी या तिघांकडून चोरलेले दागिने मोबाईल आणि काही रोकड हस्तगत केलं आहे. या तिघांनी मिळून अशाप्रकारे किती गुन्हे केले आहेत याचा तपास पोलीस करीत आहेत.

### महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी एक दिवसीय धरणे

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** अमेरिकेतील भिक्खू व अनुयायी आंदोलन करीत आहे. आंदोलन दडपण्यासाठी बिहार सरकार भिक्खूंना मध्यरात्री उचलून घेऊन जात आहेत. या घटनेमुळे लोकांमध्ये संताप निर्माण झाला आहे, दरम्यान, महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन विभागीय आयुक्त कार्यालय येथे आज झाले. हे आंदोलन संपूर्णपणे भिक्खू संघाच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली झाले आहे. या आंदोलनात बौद्ध उपासक, उपासिका यांच्यासह परिवर्तनावादी नागरिकांनी सहपरिवार सहभागी झाले होते.

# अबू आझमी यांच्या विरोधात ठाण्यात शिवसेना आक्रमक







दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता असं अबू आझमी यांनी आज म्हटलं. त्यांच्या या वक्तव्याने नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. औरंगजेब याचे अबू आझमी यांनी कौतूक करत औरंगजेब क्रूर शासक नव्हता. त्याने अनेक मंदिरे बनवली, असा खळबळजनक दावा अबू आझमी यांनी विधानसभेच्या परिसरात केला.

आमच्या महापुरुषांबद्दल जे काय वक्तव्य केलेले आहेत तसेच महापुरुषांचा अपमान केलेला आहे. जे काही भलामण करतोय एक प्रकारे देशद्रोह असल्याचे म्हस्के यांनी सांगितले. त्यांनी आमदारकीच्या राजीनामा द्यावा अशी मागणी संतप्त शिवसैनिकांनी केली आहे. राज्यपाल, मुख्यमंत्री, गृहमंत्री यांच्याकडे देखील पत्राद्वारे मागणी केली आहे.

आमदार असताना जी काही देशाप्रती शपथ घेतली होती त्याच्या विरोधात त्यांनी काम केलेल आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री यांनी कडक आदेश काढलेले आहेत. महापुरुषांबद्दल अपमान करणाऱ्यावर जी काय स्पर्धा लागलेली आहे यांना वेळीच ठेचले पाहिजे. वेळीच पोलीस ठाण्यात टाकलं पाहिजे. कारवाई करायला पाहिजे अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे म्हस्के यांनी सांगितले.

उबाठा पक्षाने हिम्मत हरलेली आहे. त्यांच्याकडे आंदोलन करायला माणसं सुद्धा नाही आहेत. त्यांनी आपला हिंदुत्वचा विचार आणि हिंदुत्वाचा तत्व इंदिरा गांधी यांच्या घरात गाहाण ठेवलेली आहे. त्यांना प्रथम राहुल गांधी आणि सोनिया गांधींची परवानगी घ्यावा लागेल. त्यानंतर ते आंदोलनात उतरतील असा टोला म्हस्के यांनी लगावला.

## राज्यमंत्री रक्षा खडसेंच्या मुलीची छेड काढणारे तिघे पोलीसांच्या अटकेत

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** मंत्री रक्षा खडसे यांच्या कन्येसह तिच्या मैत्रिणीची छेडखानी करणाऱ्या तिघांना अटक तर एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश मिळाले असल्याची माहिती पोलिस अधीक्षक यांनी दिली आहे.



या मधे मुख्य आरोपी अनिकेत भोई याचा समावेश आहे, फरार तिघा आरोपींचा पोलिसांच्या कडून शोध घेतला जात असून,उर्वरित आरोपींना ही अटक करण्यासाठी पोलिसांची तपास पथके शोध घेत आहेत.

मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी या गावी संत मुक्ताई यात्रेत छेडखानी चा प्रकार झाल्याच्या नंतर मंत्री रक्षा खडसे यांनी काल पोलिस ठाण्यात जाऊन आक्रमक भूमिका घेत आरोपींना अटक करण्याची मागणी केली होती.

आपल्या सारख्याची मुलगी जर सुरक्षित राहू शकणार नसेल तर सर्व सामान्य जनतेचे काय असा सवाल ही मंत्री रक्षा खडसे यांनी उपस्थित केल्याने, संपूर्ण राज्यभर खळबळ उडाली होती. या घटनेतील आरोपींना सोडले जाणार नाही,अशी मुखमंत्र्यांनी घोषणा केल्याने,आरोपी अटक करण्याचा पोलिसांच्या वर ही मोठा दबाव होता.




## शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काँग्रेसने बुलढाण्यात काढला एल्गार मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा एल्गार मोर्चा चे आयोजन करण्यात आले होते. शेतकरी कर्जमाफी, शेतकऱ्यांचा मालाला योग्य हमीभाव, थकलेला पिकविमा, सिंचन अनुदान व इतर मागण्यांसाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतिने एल्गार मोर्चा चे आयोजन करण्यात आले होते. सदर मोर्चा ला गांधी भवन जयस्तंभ चौक बुलडाणा येथून प्रारंभ झाला. बाजारपेठ मुख्य मार्गावरून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला आहे. यावेळी महायुती सरकाराच्या प्रतिकात्मक पुतळ्याला चपला जोडे मारत घोषणा देण्यात आल्या.

## निवडणूकीत सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण करावी यासाठी काँग्रेसचे धरणे आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** सरकारने निवडणूकीत शेतकऱ्यांना आश्र्वासने दिली होती त्याची आठवण करून देण्यासाठी आज तहसील कार्यालय पाचोरा येथे काँग्रेस ने एकदिवसीय धरणे आंदोलन केले. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे, सोयाबीन, कापूस, तुर व हरभरा या पिकांची शासनाने त्वरित खरेदी करावी, खुल्या बाजारात कमी किमतीत विकलेल्या सोयाबीन, कापूस, तूर हरभरा या पिकांना भावांतर योजना जाहीर करावी, शेतकऱ्यांना लागणारी खतं, बियाणे, कीटकनाशक व अवजारे यांना जीएसटी मुक्त करावे, पाचोरा तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकरी इतर आणि शहरातील वीज ग्राहकांना वीज मंडळाने जे स्मार्ट मीटर बळजबरीने बसवणे सुरू केले आहे. ते मीटर बसवणे त्वरित बंद करावे अशा प्रमुख मागण्या घेऊन एक दिवसीय धरणे आंदोलन काँग्रेस



पाचोरा तालुका अध्यक्ष सचिन सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

यावेळी महायुती सरकार ला आठवण करुन देण्यासाठी विविध घोषणा देण्यात आल्या. यावेळी नायब तहसीलदार विनोद कुमावत यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रदीपराव पवार, तालुका अध्यक्ष सचिन सोमवंशी, प्रदेश प्रतिनिधि शेख ईस्माइल शेख फकिरा, जिल्हा सरचिटणीस प्रताप पाटील, जिल्हा सचिव राजेंद्र महाजन, इरफान मनियार, युवक प्रदेश सरचिटणीस आशुतोष पवार, मनोहर महाले, महिला सरचिटणीस कुसुम पाटील, शरीफ शेख, शंकर सोनवणे, उबाठाचे अरुण पाटील, ॲड के एस पाटील, आंनद अहीरे, नवल भोई, युवक काँग्रेस अध्यक्ष कल्पेश येवले, सुनील पाटील, मुबारक शेख, प्रकाश भिवसने, साहेबराव पाटील, दशरथ पाटील, रामसिंग जाधव, रविंद राठोड, चेतन बोदवडे आदी मोठय़ा संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी संजय देशमुख यांच्या नेतृत्वात आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी यवतमाळच्या दिग्रस येथील मानोरा चौकात खासदार संजय देशमुख यांच्या नेतृत्वात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शिंदे गटासह सरकारवर जोरदार टीका खासदार यांनी केली. गरिब आणि सामान्य माणसाची कामे दिली सोडून तुमच्यातच भांडण लागले आहेत. शिंदेगटाच्या कामावर स्टे देण्याचा सपाटा मुख्यमंत्र्याने लावला आहेत. सरकारमध्ये एकमत नाही, तर शेतकरी आणि सामान्य नागरिकांना काय न्याय देणार आहात. कुठे आहेत पालकमंत्री? कुठे फिरत आहात? गंगेच्या नदीत डुबकी मारण्यापेक्षा या भागातील शेतकऱ्यांना न्याय द्या, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय देशमुख यांनी केली.

## ओबीसी नेत्यांनी घेतली भोकरदन तालुक्यातील आनवा येथे पीडित परिवाराच्या घरी जाऊन भेट

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील आनवा या गावात महादेव मंदिरामध्ये रात्री गावातील एका धनदाडक्या इसामाने भावाला सोबत घेऊन एका गरीब शेतकऱ्याला अमानुषपणे लोखंडी रोडची गरम करून चटके देत जीवे मारण्याचा प्रयत्न करत त्याला जखमी केल आहे, यामध्ये कैलास गोविंदा बोराडे



यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने चटके दिले होते हे प्रकरण राज्यभरात पसरलं असून त्याच पार्श्र्वभूमीवर आज ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी थेट भोकरदन तालुक्यातील अनवा येथील घटनास्थळ वाटप या पिढीत परिवाराची भेट घेत त्यांना धीर दिला आहे यावेळी त्यांनी सरकारला व पोलीस प्रशासनाला इशारा दिला आहे यामध्ये आरोपी सोन्या दौड व त्याचा धन दांडगा भाऊ नवनाथ दौड याच्यावर कठोर कारवाई करून या परिवाराला न्याय द्यावा तसेच हा परिवार सध्या भयभीत झाला असून पोलीस प्रशासनाने या बोराडे परिवाराला पोलीस प्रोटेक्शन द्यावी अशी मागणी सुद्धा यावेळी त्यांनी केली आहे.

यामध्ये जखमी झालेली बोराडे यांच्या आईने मागणी केली आहे की मागील काही दिवसापासून नवनाथ दौड हा माझ्या मुलाचा जीव घेण्याच्या उद्देशाने सतत वाद घालत होता त्यामुळे त्यांनी हे कृत्य केले असून मला व माझ्या परिवाराला या दौड परिवारापासून धोका आहे त्यामुळे यांच्यावर कडू कारवाई करावी अशी मागणी सुद्धा पीडित परिवार ने केली आहे

विविध वृत्त...

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बुलढाण्यात बौद्ध समाज बांधवांचे एक दिवसीय धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बौद्ध समाज बांधवांचे पवित्र स्थळ महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन बिहार येथे चालू आहे. या मागणीला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण देश भरामध्ये धरणे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाच्या समर्थनात आज बुलढाणा येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बौद्ध समाज बांधवांचे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येत आहे. बौद्धगया येथील महाबोधि महाविहार १९४९ चा व्यवस्थापन कायदा रद्द करण्यात यावा, महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन हे बौद्धांच्या हाती देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी मोठ्या संख्येने बौद्ध समाज बांधव उपस्थित राहून घोषणाबाजी केली आहे.

## अभिनेत्री सोनाली कुलकर्णीच्या अप्सरा आली नृत्याचा बुलढानेकरांनी घेतला आनंद



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, उमेद अंतर्गत बुलढाण्यातील जिजामाता स्टेडियम येथे चार दिवशी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे..या प्रदर्शनीमध्ये बचत गटाच्या महिलांनी दीडशेपेक्षा अधिक स्टॉल लावले आहेत.लदरम्यान विविध कार्यक्रमासह मनोरंजन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचेहे आयोजन करण्यात आले आहे, यामध्ये अप्सरा आली या गीतावर अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांचा नृत्यआविष्कार बुलढाणेकरांना अनुभवता आला.. इतर कलाकारांनी देखील उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.. या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने महिलांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.

## कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांना त्रास



दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/प्रतिनिधी :** भंडारा शहरालगत असलेल्या ग्राम खोक रला येथील स्मशानभूमी जवळील रिकाम्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने त्याचा परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच आरोग्याच्या समस्या उद्भवत असून, नागरिकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे. याबाबत काही उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## विधिमंडळासह विधानपरिषदेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब

**मुंबई/प्रतिनिधी :** विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीपासून विरोधक आक्रमक झाले आहेत. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड हे हातात बेड्या घालून विधानभवनात दाखल झाले. त्यांनी अभिव्यक्ती स्वातंर्त्यावरून सरकारवर निशाणा साधला. विधानपरिषदेत काम काजाच्या सुरूवातीलाच विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिक्षा झालेल्या मंत्र्याचा मुद्दा उपस्थित केला.

# बुलढाण्यात व्यापाऱ्याला लुटण्याचा कट बुलढाणा पोलिसांनी उधळला

## १ गावठी पिस्टल, २ जिवंत काडतूस, २ चाकू केले जप्त

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी : जिल्ह्यात गुन्हेगारी वाढतेय कां? तर याचे उत्तर होय असेल. कारण दररोज एक तरी घटना पुढे येत आहे. आज एका उद्योजकाला लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना बुलढाणा एलसीबीच्या पथकाने अटक केली असून, २ लाख १३ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे त्यांच्या कडून एक गावठी पिस्टल, दोन जिवंत काडतूस, दोन चाकू असे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.**



बालाजी इंडस्ट्रीज मालक नारायण सिनकर हे दिवसभराचे काम आटोपून रात्रीचे सुमारास माल विक्रीची रक्कम घेवून बुलढाणा स्थित घरी येतात. या बाबतची माहिति घेवून काही गुन्हेगारांनी त्यांच्यावर पाळत ठेवली. या बाबतची टिप घेवून, त्यांना रस्त्यात अडवून, रक्कम लुटण्याचा कट रचला होता. दरम्यान, बुलढाणा स्था.गु.शा. पथकाला बुलढाणा शहर ते अजिंठा रोड जवळील कृषी विज्ञान केंद्राजवळ केली आहे. जालना जिल्ह्यातील भोकरदन येथील ३० वर्षीय स्वप्निल विष्णु गवळी, वालसावंगी येथील २३ वर्षीय आकाश रमेश गवळी, सुंदरवाडी येथील २५ वर्षीय पवन जगन सपकाळ, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मुकुंदवाडी २५ वर्षीय दत्ता सुनिल राऊत आणि बुलढाणा जिल्ह्यातील जनुना येथील २४ वर्षीय लखन शालीग्राम सुर्यवंशी हे आरोपी त्यांचे साथीदारांसह व्यापारी नारायण सिनकर रा. यांना अडवून, त्यांचे कडील नगदी रक्कम लुटण्याच्या उद्देशाने तयार होते. मात्र, त्यांचा कट उधळून त्यांना स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपी विरोधात बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले असून, सदर कामगिरी एसपी विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी प्रमुख अशोक लांडे यांच्या नेतृत्वातील पथकाने ही कारवाई केली आहे.

# ग्रामीण भागातील अस्थिर वीजपुरवठ्यामुळे शेतकरी संतप्त

## शिवसेनेचे महावितरण कार्यालयाला टाळ ठोक आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील ग्रामीण भागात अस्थिर वीजपुरवठ्यामुळे नागरिक आणि शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. वारंवार होणाऱ्या लोडशेडिंगमुळे शेतीला पाणी देण्यासही मोठ्या समस्या निर्माण होत आहेत. यामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने महावितरणच्या कार्यालयाला टाळठोको आंदोलन करण्यात आले.

ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा प्रश्न्न निकाली काढण्यासाठी शिवसेना उबाठा गटाचे संपर्क प्रमुख अरुण चौधरी व महानगरप्रमुख पंडित माळी यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी महावितरण कार्यालयाला टाळा ठोको आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी शासना विरोधात जोरदार घोषणाबाजी करत, महावितरणच्या ढिसाळ कारभाराचा निषेध नोंदवला. वारंवार तक्रारी करूनही महावितरण प्रशासनाकडून ठोस उपाययोजना न केल्यामुळे शेतकरी हताश झाले आहेत. वेळेत पाणी मिळत नसल्याने पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे हा प्रश्न्न लवकरच निकाली काढला गेला नाही,तर शिवसेना उबाठा गट सर्व शेतकरी आणि नागरिक यांच्या समवेत मोठ्या स्वरूपाचे आंदोलन करतील असे यावेळी सांगण्यात आले.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम वर्जन टू चा समारंभ



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर यांच्या हस्ते राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम व्हर्जन टू चा ऑनलाईन उद्घाटन सोहळा पुणे येथील शाळेतून पार पडला आहे. सदर कार्यक्रम हा रिसोड तालुक्यातील जिल्हा परिषद भर जहागीर येथील शाळेमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. एक नाविन्यपूर्ण आणि महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, या उपक्रमाला खासदार अनुप धोत्रे विधानपरिषद आमदार भावना गवळी शिक्षक आमदार किरण सरनाईक आमदार अमित झनक यांनी शुभेच्छा दिल्या असून सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य अमित खडसे, प्राचार्य चोपडे, जिल्हा परिषद मुख्याध्यापक सौ इंगोले, डॉक्टर वाशिमकर, यांची उपस्थिती होती.

राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम (RBSK) हा मुलांच्या जीवनाची एकूण गुणवत्ता सुधारण्यासाठीचा एक प्रकारचा कार्यक्रम आहे ज्यामुळे सर्व मुलांना त्यांची पूर्ण क्षमता प्राप्त करता येते; आणि समाजातील सर्व मुलांना व्यापक काळजी देखील प्रदान केली जाते. या कार्यक्रमात जन्मापासून ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची ४ डी-जन्माच्या वेळी दोष, रोग, कमतरता आणि विकास विलंब यासाठी तपासणी समाविष्ट आहे, ज्यामध्ये लवकर ओळखण्यासाठी ३२ सामान्य आरोग्य स्थिती आणि तृतीयक स्तरावर शस्त्रक्रियांसह मोफत उपचार आणि व्यवस्थापन समाविष्ट आहे. निवडलेल्या आरोग्य स्थितींचे निदान झालेल्या मुलांना जिल्हा पातळीवर लवकर हस्तक्षेप सेवा आणि फॉलो-अप काळजी प्रदान केली जाते. या सेवा मोफत दिल्या जातात, त्यामुळे त्यांच्या कुटुंबांना उपचारांवर होणारा खर्च कमी करण्यास मदत होते.

सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रवी बोरा, डॉ. पंडितकर डॉ.श्रीकांत देशमुख, डॉक्टर शीतल पवार डॉक्टर शितल बाजड औषध निर्माता श्रीकांत इंगळे महादेव बेंडवाले अमोल खांजोडे परिचारिका सौ पार्वती खंदारे व जिल्हा परिषद शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळाली पाहिजे - हर्षवर्धन सपकाळ

दैनिक आपला विदर्भ




**वर्धा/प्रतिनिधी :** सत्तेत येत असताना केलेली आश्र्वासने याची पूर्तता झाली पाहिजे, सत्तेत आल्यावर आम्ही कर्जमाफी देऊ हे महायुतीच्या घटक पक्षांनी आणि मुख्यमंत्र्यांनी आश्र्वासन दिले होते. आता मात्र त्याचा विसर त्यांना पडला आहे. मतांचा जोगवा मागत असतांना दिलेल्या आश्र्वासनाची पूर्तता त्यांनी करावी. हीच मागणी आम्ही आज आंदोलनातून केली आहे. सोबतच शेतमालाला जो भाव आहे अडाणी अंबानी यांच चांगभलं करण्यासाठी सोयाबीनचे भाव पाडले. कापसाला भाव नाही आहे. बेरोजगारीचा मुद्दा आहे त्याहीपेक्षा ज्वलंत प्रश्न्न म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नाही, शेतकऱ्यांची दुरवस्था आहे. त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे, असे काँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. सेवाग्राम येथील संगम शिबिराला भेट देण्यासाठी हर्षवर्धन सपकाळ सेवाग्राम येथे दाखल झाले होते.

# जिल्ह्यात गहू कापणीला सुरुवात, शेतकऱ्यांना योग्य दराची अपेक्षा

दैनिक आपला विदर्भ





**नंदुरबार/प्रतिनिधी :** यावर्षी चांगला पाऊस झाल्यामुळे गव्हाचे पीक चांगल्या प्रमाणात आहे.आता जिल्ह्यात गव्हाच्या कापणीला सुरुवात झाली आहे. यंदा जिल्ह्यात समाधान कारक पाऊस झाल्याने सुमारे २३ हजार ८८२ हेक्टर क्षेत्रावर गव्हाची पेरणी करण्यात आली होती. शेतकऱ्यांनी मेहनतीने उभा केलेला गहू आता बाजारात दाखल होत असून, योग्य भाव मिळावा अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

बाजारात सध्या गव्हाला प्रतिक्विंटल १८०० ते २००० रुपये दर मिळत आहे. या मिळत असलेल्या भावाने अनेक शेतकरी असमाधानी आहेत. गहू उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर खत, बियाणे आणि मजुरीवर खर्च केला आहे. आणि आता मजूर मिळत नसल्याने हार्वेस्टर ने गहू काढणी करावी लागत आहे. यात मोठ्या प्रमाणात खर्च लागत आहे मात्र सध्याचा बाजारभाव योग्य उत्पादन खर्चाच्या तुलनेत समाधानकारक नसल्याचे शेतकऱ्योंचे म्हणणे आहे.

आम्ही महिनों महिने मेहनत घेतो, पण योग्य बाजारभाव मिळत नाही. शासनाने आधारभूत किमतीत वाढ करून ३ हजार ५०० ते ४ हजार रुपये प्रतिक्विंटल दर द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सध्या नंदुरबार बाजार समिती, शहादा, तळोदा, अक्कलकुवा आणि नवापूर येथील बाजारपेठांमध्ये गव्हाची आवक वाढत आहे परंतु योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.